या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी
नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई
वडवणी केज परळी
पाटोदा शिरूर कासार
धारूर आष्टी माजलगाव
इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | गुरुवार २३ मे २०२४ | अंक१६४ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# वेदांतचा जामीन रद्द, पण कोर्टाने त्याला प्रौढ म्हणून घोषित केलं नाही?

**पोलीस काय म्हणाले?**

वेदांत अग्रवाल नशेच्या आहारी गेलेला आहे.वेदांतने केलेला गुन्हा अत्यंत गंभीर, त्याने केलेल्या अपघातात दोन लोकांचा जीव गेलाय.समाजात वेदांत अग्रवालची ओळख पोहोचलेली आहे. त्यामुळे त्याच्या कृत्यामुळे त्याच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.वेदांत अग्रवाल बाहेर राहिल्यास त्याच्यामुळे पुन्हा समाजातील लोकांना धोका निर्माण होऊ शकतो.या सर्व बाबी विचारात घेता वेदांत अग्रवाल याला कोर्टाच्या अख्यत्यारित असणाऱ्या बालनिरीक्षणगृहात ठेवण्यात यावं, अशी मागणी पोलिसांनी बाल हक्क न्यायालयासमोर केलेली होती.

**बाल हक्क न्यायालयाचं म्हणणं काय?**



**(बीड प्रतिनिधी)**

पुणे हिट अँड रन प्रकरणातील मुख्य आरोपी वेदांत अग्रवाल याचा जामीन रद्द करण्यात आला आहे. बाल हक्क न्यायालयात आज वेदांतचे वकील आणि पोलिसांच्या बाजूने जोरदार युक्तिवात करण्यात आला. या युक्तिवादानंतर बाल हक्क न्यायालयाने निकाल जाहीर केला आहे. बाल हक्क न्यायालयाने वेदांतचा जामीन रद्द करत त्याला बाल सुधारणगृहात ठेवण्याचा निर्णय दिला. त्याला आता निरीक्षणगृहात ठेवलं जाणार आहे. पण न्यायालयाने त्याला प्रौढ म्हणून घोषित केलं नाही. विशेष म्हणजे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल घेतलेल्या पत्रकार परिषदेत वेदांतला प्रौढ म्हणून घोषित करुन कायदेशीर कडक कारवाई केली जाईल, अशी माहिती दिली होती. पण बाल हक्क न्यायालयाने वेदांतला आज प्रौढ म्हणून घोषित केलं नाही. न्यायालयाने यामागील तांत्रिक गोष्टी मांडल्या आहेत. वेदांत अग्रवाल याला प्रौढ म्हणून घोषित करण्यासाठी पोलिसांनी आज कोर्टात जोरदार युक्तिवाद केला. पोलिसांनी वेदांत कसा प्रौढ आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेदांत अग्रवालच्या केसची पार्श्वभूमी कोर्टात मांडल्यानंतर कोर्टाकडून वेदांतला प्रौढ म्हणून घोषित करण्यासाठी काही चाचण्या केल्या जाणार आहेत. वेदांतची शारीरिक परिस्थिती, त्याची मानसिकता आणि इतर गोष्टी विचारात घेऊन सबंधित चाचण्या केल्या जाणार आहेत. वेदांतला आज पुण्याच्या बाल हक्क न्यायालयाच्या बालसुधारगृहात ठेवले जाणार आहे.पोलिसांनी आपली बाजू मांडताना दोन गोष्टी प्रामुख्याने कोर्टासमोर मांडल्या.

# सामान्यांचा नवाब सुनिल काका पुस्तक प्रकाशन सोहळ्याचे अंबाजोगाईत गुरूवारी आयोजन!

**( अंबाजोगाई प्रतिनिधी )**

(अंबाजोगाई प्रतिनिधी - परवेज पटेल) वेदश्री प्रकाशन प्रकाशित सामान्यांचा नवाब सुनिल काका या पुस्तकाचे प्रकाशन सोहळ्याचे अंबाजोगाई येथे गुरूवार, दिनांक २३ मे रोजी आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात स्थानिक क्रिकेटपटूंचा सन्मान करण्यात येईल. यावेळी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमास अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन लोकनेते सुनिल काका लोमटे सामाजिक प्रतिष्ठान, अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे अंबाजोगाईकरांचे लाडके व्यक्तिमत्त्व सुनिल काका लोमटे यांचे गतवर्षी दुःखद निधन झाले. काकांविषयी अनेकांच्या मनात मोठा आदरभाव होता व आज ही कायम आहे. याच भावना पुस्तक रूपाने व्यक्त करण्याचा एक चांगला प्रयत्न लोकनेते सुनिल काका लोमटे सामाजिक प्रतिष्ठान, अंबाजोगाई यांच्या माध्यमातून करण्यात आला. वेदश्री प्रकाशन प्रकाशित सामान्यांचा नवाब सुनिल काका या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा अंबाजोगाई येथे गुरूवार, दिनांक २३ मे रोजी सायंकाळी ६ वाजता आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आला आहे. तसेच या कार्यक्रमात स्थानिक क्रिकेटपटूंचा सन्मान करण्यात येणार आहे. पुस्तक प्रकाशन मा.श्री. वसंतराव पाटील (निवृत्त न्यायाधिश) यांच्या शुभहस्ते होणार आहे. तसेच यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मा.पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे सचिव, भा.ज.पा.) या उपस्थित राहणार आहेत. तर प्रमुख उपस्थिती म्हणून सौ.नमिताताई अक्षय मुंदडा (आमदार, केज विधानसभा मतदार संघ), आ.श्री. सुरेश अण्णा धस (विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य) श्री. पृथ्वीराज साठे (माजी आमदार, केज विधानसभा मतदार संघ), श्री.संजयभाऊ दौंड (माजी विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य), श्री अभिजीत आबा पाटील (चेअरमन, विठ्ठल सहकारी साखर कारखाना, पंढरपूर) श्री.सचिन मुळुक (शिवसेना जिल्हा प्रमुख, बीड पूर्व) श्री.सतिश पत्की (सचिव, राष्ट्रीय शिक्षण प्रसारक मंडळ, बीड), श्री. शिवाजी अप्पा कापसे (सभापती, कृषि उत्पन्न समिती, कळंब) आणि सौ. विमलताई माळी (ज्येष्ठ कवयित्री, आधुनिक बहिणाबाई) या मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. तरी या प्रसंगी अंबाजोगाई शहर व परिसरातील विविध क्षेत्रात कार्यरत मान्यवर आणि नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक- लोकनेते सुनिलकाका लोमटे सामाजिक प्रतिष्ठान अंबाजोगाई यांनी केले आहे.

# कु.माहेश्वरी खोमणे व कु.गौरी वादगे यांचे एचएससी बोर्ड परीक्षेत यश





नुकत्याच जाहीर झालेल्या बारावी बोर्ड परीक्षेत पाटोदा तालुक्यातील पिठ्ठी येथील कु माहेश्वरी रामचंद्र खोमणे हिने 83.50 टक्के तर कु. गौरी मुकुंद वादगे हिने 82.17 टक्के प्राप्त करून घवघवीत यश मिळवले आहे. त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. पिठ्ठी येथील या दोन्ही विद्यार्थिनींनी यश संपादन पालकांची मान उंचवण्याचे काम केले आहे. अभ्यासात सातत्य, शिक्षक वृंद, आई-वडील, भाऊ- बहीण, यांचे योग्य मार्गदर्शन यामुळेच आपण हे यश मिळवू शकलो असे मत त्यांनी व्यक्त केले. दरम्यान यशाबद्दल त्यांचे शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद व नातेवाईकांकडून अभिनंदन व कौतुक होत आहे.

## गुरूकुल इंग्लिश स्कुल मध्ये सीबीएससी मध्ये ९२ टक्के घेवुन गणेश घुगे उत्तीर्ण



(बीड - प्रतिनिधी) बीड येथिल गुरूकुल इंग्लिश स्कुलमधील विदयार्थी गणेश लक्ष्मण घुगे यांनी सीबीएससी मध्ये 92 टक्के गुण घेऊन top 10 मध्ये उत्तीर्ण झाला असुन या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असुन त्याचा ठिकठिकाणी ह्दयसत्कार करण्यात येत आहे नेकनुर येथे त्याच्या यशाबद्दल त्याचा ह्दयसत्कार करताना नेकनुर पोलिस स्टेशनचे बालासाहेब ढाकणे,कालिदास सारूक लालासाहेब ढाकणे डॉ योगेश ढाकणे,यांनी पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला व त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# बीड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करुन ८ महिने झाले परंतु जनतेला शासनाने वाऱ्यावर सोडले - भाई विष्णुपंत घोलप

**बीड : प्रतिनिधी**

पाटोदा (प्रतिनिधी) 2023 च्या खरीप हंगामात पावसाचा मोठा खंड पडल्यामुळे शेतकऱ्यांची उभी पिके वाया गेली. सोयाबीन,तुर,मका,कापुस,मुग,उडीद,कांदा आणि इतर सर्वच पिके जवळपास 80% उत्पादन कमी झाले आहे. त्यानंतर शासनाने बीड जिल्ह्यात दुष्काळ जाहीर केला या नंतरच्या काळात सर्वच खरीप पिकाचा किमान 75% पिकविमा शेतकऱ्यांना मिळणे आवश्यक असतांना उचल म्हणून 25% अग्रीम विमा बीड जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांना मिळाला. शेतकऱ्यांचे लाईटबील संपूर्ण माफ करणे गरजेचे असतांना जिथे विद्युत पंपच चालले नाहीत तिथे शेतकरी लाईट बील कसे भरणार,बँकेकडुन शेतकऱ्याने काढलेले खरीप पीक कर्ज हे पुर्णतः माफ करणे गरजेचे आहे, किमान पीक कर्जाचे पुनगर्ठन करुन नव्याने पीक कर्ज देणे,नवीन खरीप पिकासाठी गरजेचे आहे.जिल्ह्यात दुष्काळामुळे आज बेरोजगारी जास्त वाढत चालली आहे,त्या कष्टकरी मजुरांना प्रत्येक गावच्या शिवारात किमान 100 मजुरांना रोहयोचे काम मिळेल असे कोणतेही नियोजन जिल्हा प्रशासनाने केलेले नाही.आज काही ठिकाणी जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर असतांना चारा छावण्या नाही तर किमान शेतकऱ्याला गाय,बैल,म्हैस,शेळी,मेंढी यांना जगवण्यासाठी अनुदान देणे गरजेचे आहे. जनतेला पिण्यायोग्य स्वच्छ पाणी मिळाले पाहिजे तो त्याचा अधिकार आहे. परंतु या वरील कोणत्याही विषयावर शासन गांभीर्याने घेत नाही.शासनाने दुष्काळ जाहीर करुन 8 महिने झाले तरी त्याची अंमलबजावणी केलीच नसल्यामुळे एकूणच बीड जिल्ह्यातील जनता मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत आहे याची तात्काळ दखल शासनाने घ्यावी नसता जनतेला



बरोबर घेऊन भारतीय शेतकरी कामगार पक्ष तिव्र आंदोलन करण्यात येईल असे लेखी निवेदन शेकापाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी मा.उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा यांचे मार्फत राज्याचे कृषीमंत्री तथा पालकमंत्री बीड मा.ना.धनंजयजी मुंडे साहेब यांना पाठविले आहे. माहितीस्तव मा.जिल्हाकिरी,बीड तसेच शेकापचे सरचिटणीस मा.आ.भाई जयंत पाटील यांनी दिले आहे.

### कविता

## रक्तदानशूर

रक्तदान नवे जीवनदान*
ही व्हावी सर्वत्र जनजागृती
रक्तदात्याचेही महत्त्व कळावे
पसरू दे देवा त्यांची कीर्ती

असतील अनेक रक्तदाते
मजला माहित एक रक्तदान शूर
समाजसेवेचा त्यांनी घेऊनी वसा
नाव तयाचे श्री हिरवे सर

ज्ञानदानाचे पवित्र कार्य
तुमच्याकडून रोज घडते
वाचनाच्या छंदातूनच
इतरांना पुस्तक भेट मिळते


विद्या दत्तात्रय पवार (शिक्षिका)
शिवाई विद्यालय भांडुप

# ४३ अंशापर्यंत तापमानात सतत लाईट गुल;

# नागरिकांना येतोय टेन्शन फुल ! जीवाच्या लाहीलाही सह व्यवसायांवर ही परिणाम

**(अंबाजोगाई प्रतिनिधी - परवेज पटेल)**

अंबाजोगाई शहरात व गांवा मध्ये दिवसेंदिवस तापमानात सतत वाढ होत असल्याने जीवाच्या लाहीलाहीसह व्यवसायांवरही मोठा परिणाम होत असून ४३ अंश पेक्षा जास्त राहणाऱ्या तापमानात महावितरण कंपनीकडून सतत लाईट गुल होत असल्याने नागरिकांना मात्र टेन्शन फुल येत आहे. दरम्यान गेल्या काही दिवसांपासून महावितरण कंपनीकडून विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण सातत्याने वाढतच आहे विद्युत पुरवठा खंडित झाल्याने अनेक व्यावसायिकांच्या व्य व सा या ं व र परिणाम झाला आहे. इलेक्ट्रॉनिक्स व इलेक्ट्रिकल दुकानदार, ज्यूस सेंटर, रसवंतीग्रह, हटेल व्यावसायिक, मोठ मोठ्या कपड्यांचे दुकानदार, संगणकांची तुकाने, छोटे व मोठे व्यवसाय करणारे जिथे लाईटशिवाय ग्राहकच करता येत नाही अशांचीही तारांबळ उडत आहे. या सर्वांनाच विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने अडचणींचा सामना करावा लागत आहे. ज्याचा परिणाम व्यवसायावर होऊ लागला आहे. यामुळे व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान होऊ लागले आहे. याकडे महावितरण कंपनीने लक्ष देण्याची गरज आहे गेल्या काही दिवसांपासून महावितरण कंपनीकडून विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण सातत्याने वाढतच आहे. यावर आवश्यक ते कार्य करून विद्युतपुरवठा सुरळीत करण्यात महावितरण कंपनी अपघात आहे. दिवस- रात्र कधीही आणि कुडलीही पूर्वसूचना महावितरण कंपनीकडून देण्यात व बेता विद्युत पुरवठा खंडित केला जात आहे. यामुळे नागरिक वैरागले आहेत. विशेष म्हणजे लाईट बिलहा वितरण कंपनी विद्युत पुरवठा कट करण्याचे काम ज्या त्याने करते त्याप्रमाणे विद्युत पुरवठा खंडित झाल्यास काम होताना दिसत नाही,पूर्वीपेक्षा आता विद्युत बिल न भरण्याचे किंवा उशिराने भरण्याचे प्रमाण मोका प्रभागात कमी झाले आहे. यामुळे बरखा



राहिलेला नाही. शिवाय आता कापसमेतलाई बिल भरण्याची सुद्धा गरज राहिली नाहीये वीजग्राहक बसत्यावसाया आपल्या मोबाईल बिल मात आहेत. यामुळे आता महावितरण कंपनीकडे रिफओचे कर सुद्धा राहिलेले नाही. मग विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरण कंपनी कुठे कमी पडत आहे? व का? याचे निरीक्षण व आत्मपरीक्षण महावितरण कंपनीचे अभियंता व कर्मचाऱ्यांनी करण्याची गरज आहे. सध्या शहरात दररोज जवळपास ४३ अंशापर्यंत तापमान सुरु आहे. या परिस्थितीत सतत लाईट गुल होत असल्याने नागरिकांच्या जीवाची लाहीलाही होत आहे. तसेच छोट्या मोठ्या व्या व सा यि कां च्या व्यवसायांवरही परिणाम होत असल्याने सर्वांना फुल टेन्शन येऊ लागले आहे. याची नोंद महावितरण कंपनीने घेणे आवश्यक आहे.

## अशोक हिंगे यांना मातृशोक



बीड, दि. 22: वंचीत बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे पाटील यांच्या मातोश्री सौ. शशीकला सुखदेव हिंगे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थीवावर गुरुवार दि. २३ मे रोजी सकाळी दहा वाजता बीड शहरातील अमरधाम स्मशानभूमी येथे अंत्यविधी करण्यात येणार आहे.

# सद्याची लोकसभा निवडणूक पहाता मुस्लिम समाजातील राजकीय व सामाजिक कार्यक्रत्यांनी आत्मचिंतन करतील का ?

मुस्लिम मतदारा समोर एकीकडे आड आहे तर दुसरी कडे विहीर !! मुस्लीम समाजाची आपल्या मतदानाचा हाक्क बजाऊन देखील परवड होत आहे का ? सद्या लोकसभेच्या निवडणूकीत दिसून आला आहे. महाराष्ट्र राज्य हा देशात खासदार संख्येत दुसऱ्या क्रंमाकावर आहे. एम आय एम , वंचीत वगळता प्रमूख राजकिय पक्षाने मुस्लीम समाजास उमेदवारी दिली नाही की ? की राज्यात एकही उमेदवार खासदरीकी च्या पात्रतेचा नाही , हे सुद्धा मुस्लिम समाजास विचार करण्याची गरज वाटत नाही का? महाराष्ट्रान मुस्लिम समाजातील अब्दूल रहमान अंतुले या नेत्याला मुख्यमंत्री केल पण २०२४ च्या लोकसभा निवडणूकीत राज्यात प्रमूख पक्षान एकाही मुस्लिम उमेदवार दिलेला नाही . मुस्लीमांना लोकसंख्येच्या तुलनेत प्रतिनिधीत्व मिळाल का ? 2011 च्या जनगणने नुसार महाराष्ट्राच्या एकुन लोकसंख्ये पैकी ११.५४ टक्के मुस्लीम आहेत इथल्या मुस्लिम नागरिकांची संख्या साधारन १.३० कोटी आहे. त्यात उत्तर कोकण, खानदेश, मराठवाडा आणि पच्छिम विदर्भात मुस्लिम मतदार दिसून येतात. मतदार संघाचा विचार केला तर धुळे, छत्रपती संभाजी नगर, मुंबईतील सहा लोकसभा मतदार संघ भिवंडी, नांदेड, परभणी, लातूर, वाशिम, अकोला , ठाणे, रायगड या लोकसभा मतदार संघामध्ये मुस्लीम मतदारांची संख्या आहे. परंतू लोकसंख्ये नुसार आत्तापर्यंत राजकिय प्रतिनिधीत्व मिळाल का ? हा सुद्धा प्रश्न मुस्लीमासाठी विचार करण्याचा आहे . महाराष्ट्र राज्य निर्मिती झाल्या पासून लोकसभेवर निवडून जानाऱ्या मुस्लीम खासदारांची संख्या नागण्य आहे. आता पर्यत फक्त १४ वेळा मुस्लीम खासदार लोकसभेवर निवडून गेले आहेत यातही अब्दूल रहमान आंतूले यानाच तब्बल चार वेळा सन 19८9,1९९१, १९९६ व २००४ पर्यंत कुलाबा लोकसभा मतदार संघातून निवडून नेले होते. तर १९६७ साली आकोला लोकसभा मतदारसंघात काँग्रेस कडून के. एम . ए एच सरदारखान,१९७१ मुंबई मतदारसंघात काँग्रेस कडून कादर अब्दूल साळेभाय,१९७१ अकोला मतदारसंघात काँग्रेस तर्फे के एम असगर हुशेन सरदारखान,१०७१ चांदा ( चंद्रपूर) काँगेस तर्फे अब्दूल शफी , १९८० व १९८४ वाशिम मतदार संघातून दोन वेळेस काँगेस तर्फे गुलाम नबी आझाद ,१९८० औरंगाबाद मतदार संघातून काझी सालम,१९८४ रत्नागिरी मतदारसंघातून काँग्रेस तर्फे हुशेन दलवाई ,२०१९ औरंगाबाद ए आय एम आय एम तर्फे इम्तियाज जलील हे



खासदार निवडून आले होत... मुस्लीम समाज ही काँग्रेसची पारंपारिक व्होट बँक समजली जाते . परंतू जनतेतून विचार मांडले जातात मुस्लीम समाजाचा कलही काँग्रेस च्या बाजूने आसतो. आतापर्यंतच्या लोकसभा निवडणूकींचा विचार केला तर काँग्रेसनं मुस्लिम समाजातील एकातरी उमेदवाराला संधी दिली होती परंतू या लोकसभा निवडणूकीत पहिल्यांदा काँग्रेस ने एकही मुस्लीम उमेदवार दिलेला नाही त्यामुळे अच्छर्य व्यक्त केली जात आहे... शेवटच्या टप्प्यात काँग्रेस नेते आरीक नशिम खान यानी तशी नाराजी व्यक्त केली परंतू त्यांची तशी दखल कांग्रेस पक्षाने घेतली नाही... काँग्रेस आणि महाविकास आघाडीन एकही मुस्लीम उमेदवार दिला नाही. काँग्रेस नेते मागील एका कार्यक्रमात बोलून गेले की मुस्लिम उमेदवार विजयी होईल असा उभा करायचा होता तर का उभा केला नाही. मुस्लीम जानकाराना असा प्रश्न पडतो की राज्यात काँग्रेस कडून निवडून येईल असा उमेदवार पक्षाकडून तयार का केला नाहित... की मुस्लीम समाजातील खासदार करावे असे काँग्रेस ला वाटले नाही ? हा सुद्धा मुद्दा मुस्लीम नेत्याना आत्मचिंतन करण्याची गरज आहे. मुस्लीमांना उमेदवारी देताना राजाकिय पक्षाना का करावा लागतोय विचार ? ज्या पक्षाची व्होॅट बँक मुस्लिम समाज आहे ते सुद्धा प्रतिनिधीत्व देत नाही... हे नेमका कशाचा परिणाम आहे. वेळीच मुस्लिम समाज आत्मचिंतन नाहि केल्यास पुढे येणाऱ्या प्रत्येक निवडणूकीत प्रतिनिधीत्व मिळणे कठीण होईल. स्वतःला शैक्लूरिझम महणनाऱ्या पक्षाची मानसिक्ता आशि या लोकसभा निवडणूकीत दिसून आली आहे. की मुस्लीम मतदार भाजपला मतदान करनार नाहीत तर मुस्लीम समाजास राजकीय प्रवाहात घेतल काय नाही घेतल तरी मतदान काँग्रेसलाच मतदान केल्याशिवाय दुसरा प्रयायच मुस्लीमाकडे नाही ही मानसिक्ता काँग्रेस पक्षाची झाली आहे या निवडणूकीत काँग्रेस पक्षाकडून मुस्लीम कार्यक्रत्यांना त्याचा प्रत्यय दिसून आला आहे... म्हणूनच भाजपास वाटतोय मुस्लीम आम्हाला मतदान करणार नाहीत व काँग्रेस ला खात्री आहे की मुस्लीम समाजास विचारल नाही तरी मतदान काँग्रेस ला करतील म्हणून मुस्लीम मतदारा समोर एकीकडे आड तर दूसरी कडे विहीर आशि प्ररिस्थिती मुस्लीम मतदाराची झाली आहे. यावर मुस्लीम समाज आत्म परिक्षण करतील आसच सद्यातरी म्हणावे लागेल.

# २८ हजाराची लाच घेताना माजलगाव पा.वि.चा कार्यकारी अभियंता राजेश सलगरकर जेरबंद.!

## बीड एसीबीची चौथी कारवाई.

**प्रतिनिधी-माजलगाव**

माजलगाव. येथील पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता राजेश सलगर २८हजार रुपयांची लाच घेताना बीड एसीबीने जेरबंद केले. एसीबी च्या दुसऱ्या कारवाईत प्रशांत शिवाजी डोंगरे रा.चहऱ्हाटा फाटा, बीड हा सहायक नगर रचनाकार असून त्याच्याकडे सध्या नगररचनाकार या पदाचा अतिरिक्त पदभार होता. तसेच निलेश सोपान पवार रा.आंतरवली बुद्रुक ता.गेवराई हा अभियंत्याचा मदतनीस असून शेख नेहाल शेख अब्दुल गणी रा.शहंशाह नगर, बीड हा अभियंता आहे. तक्रारदाराचे येळंबघाट शिवारातील गट क्रमांक ५८०अ(१)मधील २०.५०आर क्षेत्राचा अकृषिक परवाना काढण्यासाठी ऑनलाईन अर्ज बीपीएमस पोर्टल वर निलेश पवार यांच्या मार्फत नगर रचना कार्यालयात २६ मार्च रोजी पाठवला होता. त्यावेळी म्हणजे २एप्रिल रोजी प्रशांत डोंगरे साठी ३०हजार रु. लाचेची मागणी केली होती.तर तिसऱ्या कारवाईत पोलीसांच्या तक्रारी विरोधात होती आणि चौथ्या क्रमांकावर तक्रारदार व साक्षीदार आणि गावातील इतर पाच शेतकरी यांचे मौजे चिंचोटी तलावातील बुडीत क्षेत्रातील गाळ व माती काढून शेतात टाकण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग येथे अर्ज दिला होता सदर अर्जावरून मौजे चिंचोटी तलावातील बुडीत क्षेत्रातील गाळ व माती काढून शेतात टाकण्यासाठी परवानगी देण्यासाठी प्रत्येकी ५ हजार प्रमाणे सात जणांचे ३५ हजारांची मागणी करून तडजोड अंती प्रत्येकी ४ हजार प्रमाणे प्रत्येकी ७ जणांकडून २८ हजारांची मागणी करून सलगरकर याला सदर लाच घेताना रंगेहात जेरबंद केलेआहे. हि कारवाई पोलिस अधीक्षक संदीप आटोळे, अपर अधीक्षक मुकूंद आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक शंकर शिंदे, हनुमान गोरे, संतोष राठोड, स्नेहलकुमार कोरडे, गणेश मेहेत्रे आदींनी केली .



## अक्षता शेटे हीचे 12 वी परिक्षेत यश



बीड : प्रतिनिधीयेथील अक्षता अक्षय शेटे हीने बारावी परिक्षेत यश मिळवले आहे. या परिक्षेत 93.83% मार्क्स मिळवून ती दयानंद कॉलेज, लातूर 12 वी सीए फ ऊंडेशन बॅच मधून मेरिट मध्ये आली. बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष अशोक शेटे यांची ती नात असून रोटरी चे माजी अध्यक्ष व कर सल्लागार अक्षय शेटे यांची ती कन्या आहे. तिने आयसीएससी दहावी परीक्षेत देखील उत्तुंग यश मिळवले होते. तिने लातूर येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालय मध्ये वाणिज्य सीए फ ऊंडेशन बॅच येथे प्रवेश घेऊन हे यश मिळवले. तिला भविष्यात सीए व्हायचे आहे. त्या साठी तिने दहावी पासूनच याची तयारी सुरु केली आहे.तिच्या या यशाबद्दल दयानंद कॉलेज, लातूर चे ट्रस्टी संजय बोरा, प्राचार्य सौ.अंजली बुरांडे, सर्व प्राध्यापक तसेच सर्व मित्र मंडळी कडून तिचे व शेटे परिवाराचे अभिनंदन होत आहे.

# वीस वर्षीय तरुणाचे गळफास घेऊन आत्महत्या

**माजलगाव प्रतिनिधी**

माजलगाव शहरामधील फुलेनगर येथील रहिवाशी भारत सुरवसे यांचा मुलगा गणेश सुरवसे वय अंदाजा २० वर्ष पाच ते साडे पाच च्या दरम्यान गणेश भारत सुरवसे यांनी आपल्या राहत्या घरी गडफासघेऊन आत्महत्या केल्याची घटना माजलगाव शहरातील फुलेनगर येथे घडली सविस्तर असे की माजलगाव शहरामधील फुलेनगर येथील रहिवाशी भारत सुरवसे हे माजलगाव ते संभाजीनगर चालणारी ट्रॅव्हल्स वर ड्रायव्हर म्हणून नोकरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते दिनांक २२ बुधवार रोजी मुलगा गणेश सुरवसे वय अंदाजा २० वर्ष पाच ते साडे पाच च्या



दरम्यान आपल्या राहत्या घरी गडफासघेऊन आत्महत्या केल्याची घटना माजलगाव शहरातील फुलेनगर येथे घडली मयत गणेश सुरवसे यास माजलगाव ग्रामीण रुग्णालय येथे आणले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले

# लिट्ल फ्लॉवर कनिष्ठ महाविद्यालयाची उत्तुंग भरारी!

**बीड । प्रतिनिधी**

परळी:मॉर्डन एज्युकेशन सोसायटी परळी (वैजनाथ) द्वारा संचालित लिट्ल फ्लॉवर कनिष्ठ महाविद्यालयाने बारावी बोर्ड परीक्षा 2024 मध्ये झालेल्या परीक्षेत आपल्या यशाची परंपरा कायम ठेवत उत्तुंग भरारी घेतली आहे.

या कनिष्ठ महाविद्यालयात कला,वाणिज्य व विज्ञान या तीन शाखा असून त्यांचा निकाल पुढील प्रमाणे आहे!


इयत्ता बारावी वार्षिक निकाल विज्ञान शाखा! एकुण शेकडा निकाल 100% सर्वप्रथम पठाण सफुरा फेरोज 509 /84.83% सर्वद्वितीय शेख अनमताज अब्दुल गणी 489/81.50% सर्वतृतीय शेख अरशान हमीद 469/78.17% कला शाखा एकुण शेकडा निकाल 83.33% सर्वप्रथम पोटे संदेश जनार्दन 396/66.00% सर्वद्वितीय गडदे गणेश शिवाजी 388/64.67% सर्वतृतीय बदने सोनाली लक्ष्मण 367/61.17%

वाणिज्य शाखा एकुण शेकडा निकाल 97.72% सर्वप्रथम सय्यद रजा अतिफ रसूल 439/73.17% सर्वद्वितीय सय्यद माहेनुर तय्यब 422/70.33% सर्वतृतीय खोले प्रतिक्षा ओमप्रकाश 419/69.83% व्यावसायिक अभ्यासक्रम शाखा एकुण शेकडा निकाल 82.50% सर्वयशस्वीविद्यार्थ्यांचेहार्दिकअभिनंदन संस्थेच सचिव,अध्यक्ष,प्रशासक,तसेच महाविद्यालयाचे कर्तव्यदक्ष प्राचार्य वीरेंद्र शास्त्री, प्रा.सारडा सर,प्रा.तानाजी देशमुख,प्रा. तोंडारे सर,विजय देशमुख सर, प्रा.नवनाथ साखरे,प्रा. गणेश मेंडके,प्रा.पंजाबराव येडे,प्रा. लक्ष्मण गरड ,प्रा.संदेश आंबेगावकर,प्रा. संघपाल समुद्रे, प्रा.सातपुते सर, प्रा. सुरेश भातांगळे, प्रा.गोरे सर, प्रा. गोरे मॅडम प्रा.माने मॅडम,प्रा.यादव मॅडम,प्रा.स्वामी मॅडम,प्रा.गौरशेट्टे मॅडम,संजय सर,महेश जूनाळ,संजय माने यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या!

# गॅरेज वर काम करत यश कांबळे या विद्यार्थ्याने १२ वीच्या परीक्षेत मिळवले ७० टक्के

**बीड । प्रतिनिधी**

बीड दि. 22 (प्रतिनिधी) बारावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये बीड जिल्ह्याने छत्रपती संभाजीनगर विभागात पहिला क्रमांक पटकावला आहे. बीड शहरातील एक होतकरू विद्यार्थी यश मधुकर कांबळे याने 12 वी च्या परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. यश हा गॅरेज वर काम साहित्य देतात. मात्र यश या करतो. त्याचे वडील मधुकर कांबळे हे मिस्त्री काम करतात. अशा हलाखीच्या परिस्थितीत त्याने आपले 12 वी चे शिक्षण पूर्ण केले. 12 वी म्हणले की पालक आपल्या पाल्यांना हमखास टीवीशन लावतात. त्यांना शिक्षणासाठी महागडे



सर्वपासून वंचित होता. त्याला गॅरेज वर जाऊन काम करणे अत्यंत गरजेचे होते. त्यामुळे त्याने कसलीही टीवीशन न लावता मिळेल त्यावेळेत अभ्यास केला व 12 वी च्या परीक्षेत 77.17% टक्के मिळवले. त्याच्या या यशात आई सुरेखा कांबळे यांचे विशेष परिश्रम राहिले आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे कौतुक होत आहे.

# नियंत्रण कक्ष क्रमांक कार्यान्वित

**बीड । प्रतिनिधी**

बीड, दि. 22 :-अपत्कालीन परिस्थितीच्या वेळीची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातील नियंत्रण कक्षास कळविण्यासाठी जिल्हयातील सर्व जनतेस नियंत्रण कक्षाचा दूरध्वनी क्रमांक 02442-299299 तसेच पोलीस विभागाशी संपर्क साधण्यासाठी टोलफ्री क्रमांक 100 आणि अग्निशामक विभागाचा टोलफ्री क्रमांक 101, अपत्कालीन सेवा ॲम्बुलन्स 108 अपत्कालीन परिस्थितीमध्ये या क्रमांकावर संपर्क साधवा, असे जिल्हा अपत्तीव्यवस्थापनप्राधिकारण, आपत्ती व्यवस्थापन शाखा यांनी कळविले आहे.

# मार्शल आर्ट मुळे शारिरिक कौशल्य व बौद्धिक क्षमता प्राप्त होते - प्रा. कव्हळे सर
## कराटे मार्शल आर्ट असोसिएशन माजलगाव बेल्ट वितरण समारंभ संपन्न




**माजलगाव: ( प्रतिनिधी )**

माजलगाव तालुक्यातील शेकडो विद्यार्थी चंद्रमनी डोंगरे सरांच्या मार्गदर्शनाखाली कराटे मार्शल असोसिएशनचे प्रशिक्षण घेत असुन कराटे मार्शल आर्ट मुळे विद्यार्थ्यांना शारिरीक कौशल्य व बौद्धिक क्षमता प्राप्त होत असल्याचे प्रतिपादन लोकनेते सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे उप प्राचार्य प्रा. कव्हळे सर यांनी केले . कराटे मार्शल आर्ट असोसिएशन माजलगाव चे बेल्ट वितरण समारंभ दिनांक २१ मे २०२४ मंगळवार रोजी आयोजीत करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. श्रेयस देशपांडे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. कव्हळे सर , डॉ. अमर होरमले , पत्रकार परमेश्वर सोळंके , ॲड. प्रमोद तौर , पत्रकार अमर साळवे यांची उपस्थिती होती. सदरील प्रशिक्षण सार्थक डोंगरे , यश सक्राते , पवनराजे सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली झाले असून या वेळी एकुन ६२ विद्यार्थ्यांनी बेल्ट एक्झाम दिली असता यलो बेल्ट २५ विद्यार्थी ऑरेंज बेल्ट ८ विद्यार्था ग्रिन बेल्ट २१ विद्यार्थी ब्लु बेल्ट १ विद्यार्थी रेड बेल्ट ४ विद्यार्थी तर रोहन किरवले , मयुरेश अस्वले , ओमकार मिटकरी यांना ब्लॅक बेल्ट प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.तेजस्वीनी सोळंके अन् कु.प्रिती प्रधान यांनी केले व आभार चंद्रमनी डोंगरे यांनी मांनले प्रसंगी उत्साही पालक वर्गाची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
गुरुवार २३ मे २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4




# मुंबई, ठाण्यात तापमानाचा ताप बाहेर पडताना काळजी घ्या



मान्सून लवकरच धडकणार असल्याची वार्ता येऊन धडकली आहे. पण मुंबई,ठाणेकरांना अजून उष्णतेपासून सूटका मिळालेली नाही. सध्या या दोन जिल्ह्यांत उष्णतेची लाट आहे. तापमानाचा ताप या भागातील नागरिकांना सहन करावा लागणार आहे. मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्याला आज, गुरूवीरपर्यंत उष्ण आणि दमट वातावरणाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. मुंबई आणि ठाण्यामध्ये उष्णतेच्या लाटेची शक्यता असल्याचे प्रादेशिक हवामान विभागाने अंदाज व्यक्त केला आहे. आर्द्रता वाढल्याने अस्वस्थता प्रादेशिक हवामान विभागाने पुढील दोन दिवस उष्ण वातावरणाची शक्यता वर्तवली आहे. पावसाळा जवळ येत असल्याने मुंबई हवेतील आर्द्रता वाढली आहे. घामाचा धारा लागल्या आहेत. वातावरणातील या बदलामुळे जीवाची घालमेल होते. शरीरातील पाणी कमी होते. तर पाणी पिल्यावरही दिलासा मिळत नाही. या वातावरणामुळे मुंबईकरांमध्ये अस्वस्थता वाढली आहे

## सोनारी येथे श्री काळभैरवनाथ पुरातन मंदिर परिसरात माकडांची भटकंती..

### माकडांच्या संगोपनासाठी सचिन सोनारीकर यांची धडपड

**प्रतिनिधी | धाराशिव..**

श्री काळभैरवनाथाच्या सोनारीमध्ये (ता.परंडा) माकडांचा मोठा सहवास असून, त्यांच्या देखभालीसाठी सचिन सोनारीकर यांनी पुढाकार घेतला आहे. मात्र, तरीही माकडांची भटकंती होत असून, भक्तासह दात्यांनी अन्नदानाद्वारे सहकार्य करण्याचे आवाहन त्याने केले आहे.श्री क्षेत्र सोनारी येथे श्री काळभैरवनाथाचे पुरातन मंदिर आहे. राज्यासह कर्नाटक, आंध्र येथील भाविकांचे कुलदैवत असलेले भैरवनाथ प्रसिध्द देवस्थान आहे. येथे भाविक दर्शनासाठी गाडीतून खाली उतरताच नजर पडेल तिकडे माकडेच माकडे दिसतात. गावात, मंदिर परिसरात दोन हजारांवर माकडांची संख्या आहे. साहजिकच या माकडांच्या खाण्याची आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कोण करते, असा प्रश्न पडतो. परंतु या सर्व भैरवनाथाच्या माकडांची खाण्याची व पाण्याची व्यवस्था सोनारी येथील सचिन सोनारीकर हा एक दिवसाचाही खंड पडू न देता श्रद्धेने सेवा करत आहेत सचिन सोनारीकर हा तरुण प्रतिकूल परिस्थितीत या मुक्या वन्य प्राण्यांची, माकडांची खाण्यापिण्याची सोय करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत आहे. हे कार्य करत असताना मला अनेक अडचणीचा सामना करावा लागत असल्याचे सचिन सांगतात. मात्र, या कामात सचिन जिद्दीने एक दिवसही खंड न पडू देता या मुक्या प्राण्यांची सेवा श्रद्धेने करीत आहे. त्याचे या कामाप्रती समर्पण वाखणण्याजोगे आहे. त्याच्या कामाला समाजातील दानशूर व्यक्तींनीही सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. युवक गेल्या तीन साडे-तीन वर्षापासून नित्यनियमाने करीत आहे. माकडांना खाण्यासाठी शेंगदाणे, फुटाणे, गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, बटाटे, टमाटे, बिस्किटे, केळी आदी प्रकारचे खाद्य दिले जाते. ही माकडे उपाशी राहू नयेत, यासाठी सचिन सोनारीकर हे आपल्या ओळखीच्या समाजातील विविधव्यक्तींकडून, भैरवनाथाच्या भक्त लोकांकडून मदत मागून या माकडांची खाण्यापिण्याची सोय करतात. तसेच माकडांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय मंदिराशेजारील हातपंपाद्वारे केली जाते. या माकडांसाठी पाण्याचे टब पाण्याने भरुन ठेवले जातात. त्यामधून माकडे पाणी पितात.



## स्वामी विवेकानंद महा विद्यालयाचे बारावी परिक्षेत यश

**बीड । प्रतिनिधी**

बीड : प्रतिनिधी तालुक्यातील ताडसोन्ना येथील स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय येथील विज्ञान शाखेचा 98.42 टक्के तर कला शाखेचा 88.88 टक्के निकाल लागला. महाविद्यालयाचा एकूण निकाल 96.31टक्के एवढा लागला. महाविद्यालयात विज्ञान शाखेतून चोले रोहिणी कल्याण 85.17टक्के घेऊन महाविद्यालयातून प्रथम आली. तसेच ढाकणे अमृता रत्नाकर 84.33टक्के गुण घेऊन द्वितीय तर मुंडे माधुरी बाबासाहेब 84% घेऊन तृतीय आलेली आहे. कला शाखेतून खरात शिवानी विलास 79.33टक्के गुण मिळवून प्रथम आलेली आहे तर डोळस निकिता जीवक 76.33टक्के घेऊन द्वितीय आलेली आहे. मुंडे सिद्धेश्वर कल्याण हा 74.83टक्के गुण घेऊन तृतीय आला आहे. विद्यार्थ्यांच्या या या यशाबद्दल संस्थेचे सचिव डॉ.महादेव मुंडे, प्राचार्य सुधाकर मुंडे, सर्व प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.




# दुष्काळ व दुष्काळ सदृश्य स्थितीबाबत सूचना

**बीड/प्रतिनिधी**

बीड, दि. 22 :- जिल्हयामध्ये जून ते सप्टेंबर 2023 या कालावधीतील पर्जन्याची तुट, उपलब्ध असलेल्या भुजलाची कमतरता, दूरसंवेदन विषयक निकष, वनस्पती निर्देशांक, मृदू आर्द्रता, पेरणीखालील क्षेत्र व पिकांची परिस्थिती या सर्व घटकांचा एकत्रित विचार करुन या घटकांनी प्रभावित झालेल्या तालुक्यांमध्ये आपतीची शक्यता विचारात घेवून शासन निर्णय, महसूल व वन विभाग दि. 31 ऑक्टोबर 2023 दि. 16 फेब्रुवारी 2024 व 11 नोव्हेंबर 2023 अन्वये वडवणी, धारुर आणि अंबाजोगाई या तालुक्यांमध्ये गंभीर स्वरुपाचा दुष्काळ व बीड जिल्हयातील बीड, गेवराई, शिरुर, माजलगाव, केज, परळी, आष्टी आणि पाटोदा या तालुक्यातील महसुली मंडळामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित करुन विविध सवलती लागू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

बीड जिल्हयामध्ये आवश्यक तेथे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा टॅकरव्दारे करण्यात येत आहे. आवश्यकतेनुसार टॅंकर मंजूरीचे अधिकार संबंधित उपविभागीय अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. पाणीटंचाईच्या अनुषंगाने टॅंकर मंजूरीबाबत काही अडचण असल्यास संबंधित उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाशी व पाणी टंचाईविषयी काही तक्रार, अडचण असल्यास कार्याकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद बीड तथा नोडल अधिकारी पाणी टंचाई यांच्याशी संपर्क साधावा. तसेच जिल्हयात कोठेही जनावरांच्या चा-याबाबत टंचाई भासत असेल तर डॉ. आर. डी. कदम, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त बीड यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा. संपर्कासाठी दुरध्वनी, भ्रमणध्वनी क्रमांक खालीलप्रमाणे आहेत.

नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड दुरध्वनी क्रमांक 02442-299299, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड, भ्मणध्वनी क्र. 8668381215, उपविभागीय अधिकारी कार्यालय,बीड, (बाळू घोलप) 9922846465, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाटोदा (बाबर शेख) 9970665115, उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव, (गणेश जवादे) 9767754501, उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई (सुर्यकांत गायकवाड) 9970895622, उपविभागीय अधिकारी परळी (बी.एल. रुपनर )9422930542 आणि जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, कार्यालय बीड दूरध्वनी 0244-297022 यावर संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ- मुंडे यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com